विद्याविकास

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## विद्यार्थी विकास मंडळ

गणेशखिंड, पुणे – ४११ ००७.

**डॉ. सविता कुलकर्णी**
**संचालक** (अतिरिक्त कार्यभार)

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

---

**संदर्भ क्र. विविमं/२०२५-२६/४८७** **दि. ०९/०१/२०२६**

**प्रति,**

**मा. प्राचार्य/संचालक/विभागप्रमुख,**
**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था,**
**विद्यापीठ परिसरातील सर्व शैक्षणिक विभाग.**

**विषय : भारतीय संविधान जागृती प्रश्नमंजुषा – २०२५ बाबत.**

**संदर्भ :** १. मा. सहसंचालक, उच्च शिक्षण, पुणे विभाग यांचे जा.क्र. ससं/उशि/पुवि/परिपत्रक/२०२५/ई. २४११५०९ दि. ६ जानेवारी, २०२५ रोजीचे पत्र.

२. मा. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य यांचे जा.क्र. बैठक – २०२५/प्र.क्र./९४/समन्वयक दि. २९ डिसेंबर, २०२५ पत्र.

३. विद्यार्थी विकास मंडळाचे संदर्भ क्र. विविमं/२०२५-२६/४४२ दि. २२ डिसेंबर, २०२५ रोजीचे पत्र.

**महोदय/महोदया,**

उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये, महाराष्ट्र राज्य अनुसुचित जाती आयोग, मुंबई यांचेकडे दि. १६ सप्टेंबर, २०२५ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त व युवा करिअर, नागपूर यांनी सादर केलेल्या भारतीय संविधान जागृती प्रश्नमंजुषा – २०२५ या स्पर्धेत सहभागी होण्यासंदर्भात कळविण्यात आलेले आहे. या संदर्भात उपाध्यक्ष (सचिव दर्जा) महाराष्ट्र राज्य, अनुसूचित जाती जमाती आयोग, मुंबई यांनी दि. १२ डिसेंबर, २०२५ रोजीच्या बैठकीत खालीलप्रमाणे निर्देश दिले आहेत.

- "भारतीय संविधान जागृती प्रश्न मंजुषा" शुल्क भरण्याची प्रक्रीया दि. १८/१२/२०२५ पासून सुरु करण्यात आली असून, ज्या विद्यार्थ्यांनी नोंदणी पूर्ण केली आहे, तथापि अद्यापी शुल्क भरले नाही अशा विद्यार्थ्यांना आपल्या स्तरावर कळवावे.
- नोंदणी केलेल्या सर्व विद्यार्थ्यांना यासंदर्भातील तपशीलवार माहिती अधिकृत ई मेल वरून पाठविण्यात येणार असून, विद्यार्थ्यांना ऑनलाईन अर्ज करतांना काही समस्या उदभवल्यास त्यांनी त्यांच्या अडचणी support@yuvacareer.com या मेल आयडीवर पाठवावी, याची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात यावी.
- शाळा/महाविद्यालय/आश्रमशाळा/वसतिगृह व्यवस्थापन समिती निधीमधून/कार्यालयीन खर्चातून/इतर खर्चातून या तीन बाबीमधून प्रश्नमंजुषा परीक्षेसाठी कमीत कमी दहा विद्यार्थ्यांसाठी फी भरण्याबाबत कारवाई करण्यात यावी व महाविद्यालयांनी सर्व संकेत स्थळावरती www.yuvacareer.com ही लिंक प्रसिध्द करण्यात यावी.
- सर्व अधिकृत नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे यांचे मार्फत अधिकृत ऑनलाइन प्रमाणपत्र दिले जाईल.

या संबंधीचे सविस्तर पत्र आपल्या माहितीसाठी व उचित कार्यवाहीसाठी सोबत जोडले आहे. शासन निर्देशांचे काटेकोरपणे पालन करण्याबाबत संबंधितांना सूचित करावे.

वरील संदर्भातील निर्देश सर्व विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्याकरीता आपल्या महाविद्यालय/परिसंस्था/विभागातील मुख्य सूचनाफलकांवर तसेच जिथे विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी एकत्र येत असतात (उदा. ग्रंथालय/वाचनकक्ष/वर्गखोल्या/विश्रांतीगृह/उपहारगृह/वसतिगृह) अशा दर्शनी भागात प्रदर्शित करून सर्व विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून भारतीय संविधान जागृती प्रश्नमंजुषा – २०२५ सहभागी होण्याबाबत सूचित करावे. कळावे, ही विनंती.

**सोबत : वरीलप्रमाणे**

**(डॉ. सविता कुलकर्णी)**
संचालक, (अतिरिक्त कार्यभार)
विद्यार्थी विकास मंडळ

**महाराष्ट्र शासन**
**सहसंचालक, उच्च शिक्षण, पुणे विभाग,**
**१७, डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे-१**
**Web-www.jdhepune.in** **E-mail:jdhepune@gmail.com**
फोननं. ०२०-२६१२७८३३, २६०५१६३२, फॅक्सनं. ०२०-२६१२७८३३

जा.क्र.ससं/उशि/पुवि/ परिपत्रक/२०२५/ई 2411509 दि. ०६-०१-२०२६

प्रति,

१. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.
२. कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.
३. कुलसचिव, सर्व अकृषि अभिमत व खाजगी विद्यापीठे/संस्था, पुणे.
४. प्राचार्य /प्राचार्य, अशासकीय अनुदानित/कायम विनाअनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, शिक्षणशास्त्र, समाजकार्य, व शारिरीक शिक्षणशास्त्र महाविद्यालये, **पुणे,अहिल्यानगर व नाशिक जिल्हे.**

**विषय : भारतीय संविधान जागृती प्रश्न मंजुषा च्या अनुषंगाने दि. १२-१२-२०२५ च्या बैठकीच्या इतिवृत्तातील निर्देशानुसार कार्यवाही करणेबाबत.**

संदर्भ:- १. मा. उच्च शिक्षण संचालनालयांचे पत्र क्र. उशिसं/भारतीय संविधान प्रश्न मंजुषा/मवि-१/२०२५/ई.२४०८३२२/२०३४, दि. २४-११-२०२५
२. शासनपत्र क्र. बैठक२०२५/प्र.क्र.९४/समन्वय/दि. १७-११-२०२५
३. महारष्ट्र राज्य अनुसुचित जाती आयोग, मंबई यांचे पत्र क्र. मराअजाआ/सा.आ /प्र.क्र.५४१-२०२५/दि. २२-०९-२०२५ च्या पत्रासोबत युवा करिअर,नागपूर यांचे पत्र.
४. कार्यालयाचे पत्र जा.क्र.ससं/उशि/पुवि/ परिपत्रक/२०२५/ई२४११५०९, दि. २५-११-२०२५
५. मा. जिल्हा नियोजन अधिकारी तथा जिल्हा अल्पसंख्यांक अधिकारी जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे यांचेकडील पत्र क्र. जिनिसपु/नि-९/हि-कि-चा/२५४६/२०२५-२६, दि. १७-१२-२०२५
६. कार्यालयाचे पत्र जा.क्र.ससं/उशि/पुवि/परिपत्रक/२०२५/ई२४७९४९२, दि. १८-१२-२०२५
७. शासनपत्र क्र. बैठक२०२५/प्र.क्र.९४/समन्वय/दि. २९-१२-२०२५

उपरोक्त संदर्भिय विषयाबाबत उपरोक्त संदर्भिय पत्रासोबत दि. २९-१२-२०२५ रोजीच्या शासन पत्राचे अवलोकन करावे.

शासनपत्रान्वये महारष्ट्र राज्य अनुसुचित जाती आयोग, मंबई यांचेकडे दि. १६-०९-२०२५ रोजीच्या बैठकीच्या इतिवृत्त व युवा करिअर, नागपूर यांनी सादर केलेल्या भारतीय संविधान जागृती प्रशन मंजुषा-२०२५ संदर्भात निर्देशकातील सुचनांच्या अनुषंगाने कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल

आयोगास व शासनास सादर करण्याबाबत कळविले आहे. तसेच मा. जिल्हा नियोजन अधिकारी तथा जिल्हा अल्पसंख्यांक अधिकारी जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे यांचेकडील दि. १७-१२-२०२५ च्या पत्रानुसार आपणास दि. २५-११-२०२५ व १८-१२-२०२५ च्या कार्यालयीन पत्रान्वये वेळोवेळी कळविण्यात आलेले आहे.

त्याअनुषंगाने विभागातील सर्व विद्यापीठे तसेच महाविद्यालयामध्ये भारतीय संविधान जागृती प्रश्न मंजुषा च्या अनुषंगाने दि. १२-१२-२०२५ च्या बैठकीच्या इतिवृत्तातील निर्देशानुसार आपल्या स्तरावरुन तात्काळ कार्यवाही करावी.

**सोबत :** संदर्भिय पत्र.

Digitally signed by
Ashok Uddhav Ubale
Date: 06-01-2026
17:06:25

**(डॉ. अशोक उबाळे)**
सहसंचालक (उच्च शिक्षण)
पुणे विभाग, पुणे

**प्रत :** मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, शिवाजीनगर, पुणे-१६.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मंत्रालय विस्तार, चौथा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२
Email ID:- do.asthahte-mh@gov.in

क्रमांक:- बैठक -२०२५/प्र.क्र. ९४/समन्वय दिनांक:- २९ डिसेंबर , २०२५.

प्रति,

१) संचालक, (उच्च शिक्षण), उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२) संचालक, (तंत्र शिक्षण), तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
३) संचालक, ( कला ), कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

**विषय - "भारतीय संविधान जागृती प्रश्न मंजुषा" च्या अनुषंगाने दिनांक १२/१२/२०२५ च्या बैठकीच्या इतिवृत्तातील निर्देशानुसार कार्यवाही करण्याबाबत**

संदर्भ- शासनाचे समक्रमांकाचे दिनांक १७/११/२०२५ चे पत्र .

महोदय,

सोबत महाराष्ट्र राज्य अनुसुचित जाती आयोग, मुंबई यांचे क्रमांक मराअजाजआ/मुं/ सामाजिक व आर्थिक विभाग/प्र.क्र. ५४१-२०२५/ ५३४५, दि. १७/१२/२०२५ चे पत्र व त्यासोबतचे युवा करियर, नागपूर यांचे पत्र सोबत पाठविण्यात येत आहे.

२. यापूर्वी शासनाच्या संदर्भाधीन पत्रान्वये, "भारतीय संविधान जागृती प्रश्न मंजुषा" च्या आयोजनासंदर्भात उपाध्यक्ष (सचिव दर्जा), महाराष्ट्र राज्य अनुसुचित जाती जमाती आयोग, मुंबई यांचेकडे दिनांक १६/९/२०२५ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्तातील निर्देशानुसार, सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

३. या संदर्भात उपाध्यक्ष (सचिव दर्जा), महाराष्ट्र राज्य अनुसुचित जाती जमाती आयोग, मुंबई यांनी दिनांक १२/१२/२०२५ रोजीच्या बैठकीत उच्च व तंत्र शिक्षण विभागाशी संबंधित खालीलप्रमाणे निर्देश दिले आहेत.

- विविध विभागांच्या वेबसाईटवर माहिती उपलब्ध असली तरी अनेक महाविद्यालयांपर्यंत पोहोचलेली नाही, असे निदर्शनास आले आहे.
- महाविद्यालयातील प्राध्यापकांची बैठक आयोजित करुन त्यांना संविधान जागृती प्रश्न मंजुषाबाबतची माहिती देण्यात यावी व त्यांना संविधान जागृती प्रश्न मंजुषाची माहिती विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याबाबत निर्देश देण्यात यावेत.
- प्रत्येक जिल्हयासाठी किमान २ समन्वयकाची नेमणुक करण्यात यावी.

- संचालक कार्यालयामार्फत जिल्हानिहाय अहवाल आयोगास सादर करावे.
- दोन्ही विभागांच्या सह संचालक यांनी विभाग निहाय विद्यापीठांचे कुलसचिव व महाविद्यालयांचे प्राचार्य यांचे प्रशिक्षण व बैठक आयोजित करावी.
- "भारतीय संविधान जागृती प्रश्न मंजुषा"शुल्क भरण्याची प्रक्रीया दि. १८/१२/२०२५ पासून सुरु करण्यात येणार असून, ज्या विद्यार्थ्यांनी नोंदणी पूर्ण केली आहे, तथापि अद्यापी शुल्क भरले नाही अशा विद्यार्थ्यांना आपल्या सर्व विभागांनी आपल्या स्तरावर कळवावे.
- सर्व विभागांनी आपल्या अधिनस्त असलेले सर्व शाळा/महाविद्यालय/आश्रमशाळा/ वसतिगृह व संस्था किती त्याची संपूर्ण माहिती आणि ज्या मुद्यावरील कार्य करावयाचे आहे त्या मुद्याच्या अनुषंगाने सविस्तर माहिती आयोगास सादर करावा.
- नोंदणी केलेल्या सर्व विद्यार्थ्यांना यासंदर्भातील तपशीलवार माहिती अधिकृत ईमेलवरून पाठविण्यात येणार असून, विद्यार्थ्यांना ऑनलाईन अर्ज करतांना काही समस्या उदभवल्यास त्यांनी त्यांच्या अडचणी support@yuvacareer.com या मेल आयडीवर पाठवावी, याची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात यावी.
- शाळा /महाविद्यालय / आश्रमशाळा / वसतिगृह व्यवस्थापन समिती निधीमधून / कार्यालयीन खर्चातून / इतर खर्चातून या तीन बाबीमधून प्रश्नमंजुषा परीक्षेसाठी कमीत कमी दहा विद्यार्थ्यांसाठी फी भरण्याबाबत कारवाई करण्यात यावी व सर्व शासकीय विभागांनी व विद्यापीठांना व महाविद्यालय सर्व संकेत स्थळावरती www.yuvacareer.com ही लिंक प्रसिध्द करण्यात यावी.
- सर्व अधिकृत नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे यांचे मार्फत अधिकृत ऑनलाइन प्रमाणपत्र दिले जाईल. संविधान जागृती प्रश्न मंजूषा संबंधी केलेल्या कार्यवाही अहवाल आयोकडे सादर करण्यात यावा.

४. तरी, उपांध्यक्ष (सचिव दर्जा), महाराष्ट्र राज्य अनुसुचित जाती जमाती आयोग, मुंबई यांचेकडे दिनांक १६/९/२०२५ व दिनांक १२/१२/२०२५ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त व युवा करीयर, नागपूर यांनी सादर केलेल्या भारतीय संविधान जागृती प्रश्न मंजुषा-२०२५ संदर्भात निर्देशिकातील सूचनांच्या अनुषंगाने आपल्या स्तरावर आवश्यक कार्यवाही करुन, केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल आयोगास तसेच शासनास सादर करण्यात यावा, ही विनंती.

आपली,

सोबत : वरीलप्रमाणे.

सं. चं. जाधव

( संचिता जाधव )
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

उपसचिव ( म.शि./ तांशि/ विशि), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई

आ.क्र. २३८/समन्वय
२३/९/२५

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आयोग

प्रशासकीय इमारत, पहिला मजला, पूर्व विभाग, डेअरी विभाग,
अब्दुलगफार खान मार्ग, वरळी सी फेस, मुंबई-४०० ०१८.
दूरध्वनी क्र.(कार्यालय): २४९४३८१९/०२ E-mailadd:-scstcomm@yahoo.com

जा.क्र.मराअजाआ/सा.आ./प्र.क्र.५४१-२०२५/3922 दिनांक:22/०९/२०२५

प्रति,

१.मा.सचिव,सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,मंत्रालय,मुंबई-३२
२.मा.सचिव,आदिवासी विकास विभाग,मंत्रालय,मुंबई-३२
३.मा.सचिव,उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय,मुंबई-३२
४.मा.सचिव,शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय,मुंबई-३२
५.मा.सचिव,इतर मागासवर्गीय बहुजन कल्याण विभाग, मंत्रालय,मुंबई-३२
६.मा.सचिव,अल्पसंख्यांक विभाग, मंत्रालय,मुंबई-३२
७.मा.सचिव,माहिती व जनसंपर्क विभाग, मंत्रालय,मुंबई-३२
८.मा.आयुक्त,आदिवासी विकास विभाग,राम गणेश गडकरी चौक,जुना आग्रा रोड,नाशिक-२२
९.मा.आयुक्त,समाज कल्याण आयुकतालय,म.रा.पुणे
१०.कुलगुरू,महाराष्ट्र विधी विद्यापीठ,नागपूर
११.मा.महासंचालक,डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था,म.रा.पुणे
१२.मा.संचालक,आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,म.रा.पुणे

**विषय :** " भारतीय संविधान जागृती प्रश्न मंजुषा २०२५ "च्या अनुषंगाने दि.१६/०९/२०२५ रोजी आयोजित केलेल्या इतिवृत्त.

महोदय,

अर्जदार श्री.मोनाल अ. थुल युवा करियर बोधीवृक्ष शिक्षण संस्था यांच्या उपरोक्त विषयाबाबत "संविधान जागृती प्रश्न मंजुषा-२०२५" च्या अनुषंगाने दि.१६/०९/२०२५ रोजी मा.ॲड.धर्मपाल मेश्राम,उपाध्यक्ष (सचिव दर्जा),महाराष्ट्र राज्य अनुसूचितं जाती आयोग, मुबई यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीचे इतिवृत्त सोबत जोडले आहे. इतिवृत्तात दिलेल्या निर्देशानुसार अनुपालन अहवाल आयोगास तात्काळ सादर करावा ही विनंती.

मा.ॲड.धर्मपाल मेश्राम, उपाध्यक्ष (सचिव दर्जा),महाराष्ट्र राज्य, अनुसूचित जाती आयोग, मुंबई यांच्या आदेशानुसार कळविण्यांत येत आहे.

श्री.का.
सादर करावे
गोरे
२३.०९.२०२५

महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती/जमाती आयोग मुंबई

(मिनाक्षी आडे)
वरिष्ठ संशोधन अधिकारी
महाराष्ट्र राज्य अनु.जाती आयोग,
वरळी,मुंबई

२३/९/२५

प्रत :- अर्जदार श्री.मोनाल अ. थुल युवा करियर बोधीवृक्ष शिक्षण संस्था, नागपूर

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोग

प्रशासकीय इमारत, पहिला मजला, पूर्व विभाग, डेअरी विभाग,
अब्दुलगफारखान मार्ग,वरळी सी-फेस, मुंबई-४०० ०१८.
दूरध्वनी क्र.(कार्यालय) ०२२-२४९४३८१९,

आयोगाचे मा.ॲड. धर्मपाल मेश्राम, उपाध्यक्ष तथा सदस्य यांचे अध्यक्षतेखाली दि. १६/०९/२०२५ रोजी आयोगाच्या कार्यालयात झालेल्या बैठकीचे इतिवृत्त खालीलप्रमाणे.

## (सामाजिक व आर्थिक विभाग) प्रकरण क्रमांक- ५४१/२०२५

विषय :भारतीय संविधान जागृती प्रश्न मंजुषा- २०२५ : युवा करिअरद्वारे निर्देशिका.

सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय मुंबई यांचे वतीने श्री. सुरज मुनेश्वर, कक्ष अधिकारी उपस्थित. सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे वतीने प्रतिनिधी उपस्थित. सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे वतीने श्री. अनिरुध्द कुलकर्णी, अवर सचिव उपस्थित. सचिव, माहिती व जनसंपर्क विभाग, मंत्रालय मुंबई यांचे वतीने श्री. निलेश तायडे उपस्थित. श्रीमती चंचल पाटील, सहसंचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे व महासंचालक, डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे वतीने श्री. सुमेध थोरात, प्रकल्प व्यवस्थापक युवा करियर बोधीवृक्ष शिक्षण संस्थेचे श्री.मोनाल अ. थुल उपस्थित होते.

श्रीमती चंचल पाटील, सहसंचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी नमूद केले की, शाळा व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या वयोगटानुसार वर्ग -८ वी ते पदवीधर पर्यंतच्या शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनुसार कार्यक्रमाबाबत जागरुकता निर्माण करावी लागेल. तसेच सर्व संबंधित विभागाच्या मार्फत शाळा, महाविद्यालय, आश्रमशाळा, वसतीगृह व प्रशिक्षण संस्था व इतर संस्था यांचेपर्यंत तात्काळ प्रभावाने आयोजनाची माहितीबाबत विद्यार्थ्यांमध्ये पोहचणेबाबतची परिपत्रके काढणे आवश्यक आहे.

महासंचालक, डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे वतीने श्री.सुमेध थोरात, प्रकल्प व्यवस्थापक यांनी नमूद केले की, संविधान अमृत महोत्सवी जनजागृतीबाबत उपक्रमाकरिता जिल्हाधिकारी कार्यालयाकडे तशी तरतूद उपलब्ध आहे. त्या निधीतून सदर उपक्रम राबविता येईल. तसेच सध्या २ महिने बाकी आहेत. सदरचा उपक्रम हा तात्काळ प्रभावाने महाराष्ट्रातील सर्व विद्यार्थ्यांपर्यंत पोहचवून नोंदणी करणे आवश्यक आहे. तसेच जर १५ दिवसांच्या प्रशिक्षण अभ्यासक्रम, संकेतस्थळ व इतर संबंधित तयारी तात्काळ करणे आवश्यक आहे. जर प्रशिक्षणाबाबत अभ्यासक्रम ३ भाषेमध्ये उपलब्ध असेल तर तो ऑनलाईन संकेतस्थळाद्वारे विद्यार्थ्यांपर्यंत पोहचणे आवश्यक आहे. तसेच या अभ्यासक्रमामध्ये नागरिकांसंबंधित भाग-३ रा मुलभूत हक्क, भाग-४ राज्य निर्देशत्वाची माहिती, मुलभूत कर्तव्य याबाबतची माहिती, संविधानाबाबत व त्यातील कायद्यांची माहिती देणे गरजेचे आहे. याबाबत सविस्तर सहाय्यता करण्यास विभाग तत्पर राहिल.

सचिव, शालेय शिक्षण विभाग,मंत्रालय, मुंबई यांचे वतीने श्री. अनिरुध्द कुलकर्णी, अवर सचिव यांनी नमूद केले की, सदर उपक्रमाबाबत संबंधित कार्यालयाकडून संविधान अमृत महोत्सव सन २०२४-२५ पासून "घर घर संविधान" कार्यक्रमासाठी निधी उपलब्ध करुन देणेबाबतचा प्रस्ताव राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांना सादर करण्यात आला होता. त्यानुसार दि. १२.१२.२०२४ नुसार शालेय शिक्षण व साक्षर विभाग, शिक्षा मंत्रालय, भारत सरकार यांच्या मार्गदशर्क सुचनेनुसार संविधान दिन साजरा करण्यासाठी सूचक उपक्रम देण्यात आले असून त्याबाबत मार्गदर्शक सुचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांच्या पत्रानुसार घर घर संविधान कार्यक्रम साजरा करणेबाबतचा निधी वितरीत केला आहे.

सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय मुंबई यांचे वतीने श्री. सुरज मुनेश्वर, कक्ष अधिकारी यांनी नमूद केले की, सदर उपक्रमाबाबत आयोगामार्फत प्रस्ताव विभागास सादर केल्यास व आयोगाने त्याबाबतच्या दिलेल्या निर्देशानुसार प्रस्ताव मा. सचिव यांचेकडे निधीबाबतचा प्रस्ताव सादर करण्यात येईल. सदर उपक्रमाचा लाभ विद्यार्थ्यांना घेण्याकरिता निधीची तरतूद करता येईल.

तसेच, या उपक्रमाची जिल्हास्तरीय अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये सहाय्यक आयुक्त व प्रकल्प अधिकारी यांची नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात यावी. हे नोडल अधिकारी जिल्ह्याच्या पातळीवर सर्व शैक्षणिक संस्थांमध्ये स्पर्धेची माहिती पोहोचविणे, विद्यार्थ्यांचा सहभाग निश्चित करणे, आयोजनाची देखरेख करणे आणि आर्थिक खर्चाचा हिशोब सादर करणे यास जबाबदार राहतील.

वरील सर्व बाबींची काटेकोर अंमलबजावणी करून संविधान प्रश्नमंजुषा २०२५ हा उपक्रम राज्यभर यशस्वीरीत्या पार पाडण्यात यावा, असे निर्देशित करण्यात येत आहे.

संविधान अमृतमहोत्सवी जनजागृती अभियान अंतर्गत आयोजित संविधान प्रश्नमंजुषा २०२५ या राज्यव्यापी उपक्रमात जास्तीत जास्त विद्यार्थी सहभागी होतील यासाठी सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई व सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी तात्काळ कार्यवाही करणे अत्यावश्यक आहे. यानुसार राज्यातील सर्व शाळा, कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालये, तांत्रिक शिक्षण संस्था तसेच विद्यापीठांना या उपक्रमाची सविस्तर माहिती त्वरित कळविणारे परिपत्रक जारी करावे, जेणेकरून संबंधित संस्था विद्यार्थ्यांना वेळेत मार्गदर्शन करून त्यांचा सक्रिय सहभाग सुनिश्चित करू शकतील. सदर परिपत्रकात प्रत्येक शाळा, महाविद्यालय व विद्यापीठांनी त्यांच्या अधिकृत संकेतस्थळावर (website) संविधान प्रश्नमंजुषा २०२५ या आयोजनाची माहिती ठळकपणे प्रसिद्ध करण्याबाबत स्पष्ट सूचना द्याव्यात, जेणेकरून विद्यार्थ्यांना स्पर्धेचे नियम, नोंदणी प्रक्रिया व महत्त्वाचे दिनांक याबाबत सहज माहिती मिळेल. तसेच प्रत्येक जिल्ह्यात या उपक्रमाच्या समन्वयासाठी एक जिल्हा समन्वयक (District Coordinator) नेमण्यात यावा. नेमलेल्या समन्वयकांचे नाव, पदनाम व संपर्क क्रमांक यांची माहिती संकलित करून ती त्वरित राज्य अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती आयोगास सादर करण्यात यावी.

संविधान अमृत महोत्सवी जनजागृती अभियान अंतर्गत आयोजित संविधान प्रश्नमंजुषा २०२५ हा उपक्रम विद्यार्थ्यांपर्यंत भारतीय संविधानाचे महत्त्व, त्यातील मूलभूत अधिकार व कर्तव्ये याबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी राबविण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर इतर मागासवर्गीय बहुजन कल्याण विभाग तसेच अल्पसंख्याक विकास विभाग यांनी त्यांच्या विविध योजनांद्वारे लाभ घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांपर्यंत या कार्यक्रमाची सविस्तर माहिती पोहोचविण्यासाठी तात्काळ कार्यवाही करावी. संबंधित विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग सुनिश्चित करण्यासाठी परिपत्रक जारी करून कार्यक्रमाची माहिती सर्व शैक्षणिक संस्था, निवासी शाळा, वसतिगृह, प्रशिक्षण केंद्रे इत्यादींना लेखी स्वरूपात कळविण्यात यावी.

सदर परिपत्रकात विद्यार्थ्यांना संविधान प्रश्नमंजुषा २०२५ ची उद्दिष्टे, स्पर्धेतील सहभागाची पद्धत, नोंदणी प्रक्रिया, अंतिम दिनांक तसेच जिल्हास्तरीय संपर्क अधिकारी यांची माहिती स्पष्टपणे नमूद करण्यात यावी. विभागांनी आपल्या सर्व संलग्न प्राधिकरणे, संस्था व प्रकल्प कार्यालयांमार्फत विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष मार्गदर्शन करीत जास्तीत जास्त सहभाग मिळवून देण्यासाठी आवाहन करावे. या संपूर्ण जनजागृती उपक्रमाची प्रगती, विद्यार्थ्यांचा प्रतिसाद, तसेच राबविण्यात आलेल्या उपाययोजना याबाबतची सविस्तर माहिती राज्य अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती आयोगास लेखी स्वरूपात सादर करावी.

विद्यार्थ्यांसाठी संविधानावर आधारित अभ्यासक्रम तयार करावा व जिल्हास्तरावरील तसेच राज्यस्तरावरील स्पर्धेसाठी प्रश्नपत्रिका परस्पर समन्वय साधून तयार करावी. संविधानाशी संबंधित विषय तांत्रिक व कायदेशीर स्वरूपाचे असल्याने विद्यार्थी सहजतेने समजू शकतील अशा पद्धतीने मराठी, हिंदी आणि इंग्रजी या तिन्ही भाषांमध्ये प्रश्नपत्रिका व मार्गदर्शक साहित्य वेळेत तयार केलेला अभ्यासक्रम, प्रश्नपत्रिका व त्यासंबंधीची संपूर्ण कार्ययोजना याबाबतचा सविस्तर अहवाल आणि प्रगती व माहिती त्याचे अनुपालन संबंधित सर्व विभागांनी संयुक्तरित्या राज्य अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती आयोगास तात्काळ प्रभावाने सादर करण्यात यावी.

महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती/जमाती आयोग, मुंबई

(ॲड. धर्मपाल मेश्राम)
उपाध्यक्ष तथा सदस्य

# महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोग

प्रशासकीय इमारत, पहिला मजला, डेअरी विभाग,
अब्दुलगफार खान मार्ग, वरळी सी फेस, मुंबई-४०० ०१८.
दूरध्वनी क्र.(कार्यालय): २४९४३८१९/०२
E-mailadd:-scstcomm@yahoo.com

जा.क्र.मराअजाजआ/मुं/सामाजिक व आर्थिक विभाग/प्र.क्र. ५४१-२०२५/ 5345 दि: 17 /१२/२०२५

**प्रति,**

१) मा. अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
२) मा. प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
३) मा. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
४) मा. प्रधान सचिव, माहिती व जनसंपर्क विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
५) मा. सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
६) मा. सचिव, इतर मागासवर्गीय बहुजन कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२
७) मा. सचिव, अल्पसंख्यांक विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
८) मा. कुलगुरू, महाराष्ट्र विधी विद्यापीठ, नागपूर.
९) मा. आयुक्त, आदिवासी विकास विभाग, राम गणेश गडकरी चौक, जुना आग्रा रोड, नाशिक.
१०) मा. आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
११) मा. आयुक्त, अल्पसंख्यांक विभाग, मुंबई
१२) मा. अपर आयुक्त, आदिवासी विकास विभाग (सर्व)
१३) मा. महासंचालक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), महाराष्ट्र राज्य, पुणे.
१४) मा. संचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संसथा (TRTI), महाराष्ट्र राज्य, पुणे.
१५) मा. संचालक, उच्च शिक्षण विभाग, मध्यवर्ती इमारत, डॉ. ॲनी बेझंट मार्ग, पुणे - ४११००१.
१६) मा. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, ३, महापालिका मार्ग, मेट्रो सिनेमा समोर, मुंबई -४००००१.
१७) मा. संचालक, कला संचालनालय विभाग, जुने सचिवालय, विस्तार भवन, महात्मा गांधी रोड, मुंबई - ४०० ०३२.
१८) मा. संचालक, इतर मागास बहुजनकल्याण विभाग, पुणे
१९) मा. सह संचालक, उच्च शिक्षण विभाग (सर्व)
२०) मा. सह संचालक, तंत्र शिक्षण विभाग (सर्व)
२१) मा. सह संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक (सर्व)
२२) मा. प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण विभाग (सर्व )
२३) मा. प्रादेशिक उपसंचालक, इतर मागास बहुजनकल्याण विभाग (सर्व)
२४) मा.जिल्हा नियोजन अधिकारी तथा जिल्हा अल्पसंख्याक अधिकारी जिल्हाधिकारी कार्यालय (सर्व)
२५) मा. नियोजन अधिकारी (सर्व)
२६) मा. जिल्हा माहिती अधिकारी (सर्व)

**विषय : संविधान जागृती प्रश्न मंजुषा - २०२५.**

*(कृ.मा.प.)*

मा. महोदय,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आयोगाचे मा.ॲड. धर्मपाल मेश्राम, उपाध्यक्ष तथा सदस्य (सचिव दर्जा), महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोग, वरळी, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली दि. १२.१२.२०२५ रोजी संविधान जागृती प्रश्न मंजूषा-२०२५ या विषयावावत डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, नागपूर येथील सभा कक्ष क्र. १०४ येथे बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीचे इतिवृत सोबत जोडले आहे. बैठकी दरम्यान व इतिवृत्तामध्ये दिलेल्या निर्देशानुसार अहवाल आयोगास सादर करावा, ही विनंती.

मा.ॲड. धर्मपाल मेश्राम, उपाध्यक्ष तथा सदस्य (सचिव दर्जा), महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोग, वरळी, मुंबई यांच्या निर्देशानुसार कळविण्यात येत आहे.

महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती/जमाती आयोग मुंबई

( रमेश वळवी )
पोलीस निरीक्षक,
महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोग,
वरळी, मुंबई.

# महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोग

प्रशासकीय इमारत, पहिला मजला, पूर्व विभाग, उत्तरी विभाग,
अब्दुल गफार खान मार्ग, वरळी सीफेस, मुंबई-४०० ०१८
दूरध्वनी क्र. (कार्यालय) ०२२-२४९४३८१९,


## संविधान जागृती प्रश्न मंजूषा-२०२५ बैठकीचे इतिवृत्त

### मा. ॲड. धर्मपाल मेश्राम, उपाध्यक्ष तथा सदस्य, महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोग, मुंबई यांचे अध्यक्षतेखाली दि. १२ डिसेंबर, २०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता नागपूर येथे आयोजित बैठकीचे इतिवृत्त

दिनांक १२ डिसेंबर, २०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, सभा कक्ष क्र. १०४, नागपूर येथे मा. ॲड. धर्मपाल मेश्राम, उपाध्यक्ष तथा सदस्य महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोग, मुंबई यांचे अध्यक्षतेखाली संविधान जागृती प्रश्न मंजूषा-२०२५ बैठक घेण्यात आली. सदर बैठकीला खालील अधिकारी उपस्थित होते.

| अ. क्र. | पदाधिकारी / अधिकारी यांचे नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | मा. ॲड. धर्मपाल मेश्राम | उपाध्यक्ष तथा सदस्य महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोग, मुंबई |
| २ | श्री. सुनिल वारे | महासंचालक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे |
| ३ | श्री. सारंग पाटील | अवर सचिव, अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई |
| ४ | श्री. जहांगीर खान | अवर सचिव, अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई |
| ५ | श्री. अतुल पांडे | जिल्हा माहिती व जनसंपर्क अधिकारी, नागपूर |

तर दुरदृष्य प्रणालीव्दारे राज्यातील सर्व विविध विभागाचे विभाग प्रमुख व प्रतिनिधी उपस्थित होते.

सभेच्या सुरुवातीला श्री. सुबोध थोरात, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), म. रा., पुणे यांनी सदर प्रश्न मंजूषा संबंधी संपूर्ण माहितीच्या प्रास्ताविकेची माहिती उपस्थितांना सांगितली.

त्यानंतर मा. ॲड. धर्मपाल मेश्राम, उपाध्यक्ष तथा सदस्य, महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोग, मुंबई यांनी उपस्थित व दुरदृष्य प्रणालीद्वारे उपस्थित अधिकाऱ्यांशी संवाद साधून खालीलप्रमाणे निर्देशित करण्यात आले.

१. आदिवासी विभाग

- सर्व शाळा, आश्रम शाळा आणि लाभार्थी यांच्यापर्यंत माहिती पोहोचावी.
- प्रत्येक जिल्ह्यात २ समन्वयकांची नियुक्ती करण्यात यावी.
- शाळा / महाविद्यालय / आश्रमशाळा / वसतिगृह यांनी कार्यालयीन खर्चासाठी प्राप्त होणाऱ्या खर्चातून किमान १० विद्यार्थ्यांची परिक्षा शुल्क भरावे.

२. अल्पसंख्याक विभाग
- सर्व जिल्हा अल्पसंख्यांक अधिकाऱ्यांनी संविधान प्रश्न मंजूषाबाबत सूचना देणारे मार्गदर्शन पत्रक जिल्हा स्तरीय कार्यालयाला तात्काळ देण्यात यावे.
- संविधान जागृती प्रश्न मंजूषा स्पर्धेत विद्यार्थ्यांना सहभाग घेण्यासाठी प्रोत्साहीत करण्यात यावे.
- प्रत्येक जिल्ह्यासाठी किमान २ समन्वयकाची नेमणूक करण्यात यावी.

३. तंत्र शिक्षण विभाग व उच्च शिक्षण विभाग
- विविध विभागांच्या वेबसाइटवर माहिती उपलब्ध असली तरी अनेक महाविद्यालयांपर्यंत पोहोचलेली नाही, असे निर्दशनास आले आहे.
- महाविद्यालयातील प्राध्यापकांची बैठक आयोजित करुन त्यांना संविधान जागृती प्रश्न मंजूषाबाबतची माहिती देण्यात यावी व त्यांना संविधान जागृती प्रश्न मंजूषाची माहिती विद्यार्थ्यांपर्यंत पोहविण्याबाबत निर्देश देण्यात यावे.
- प्रत्येक जिल्ह्यासाठी किमान २ समन्वयकाची नेमणूक करण्यात यावी.
- संचालक कार्यालयामार्फत जिल्हानिहाय अहवाल आयोगास सादर करावे.
- दोन्ही विभागांच्या सह संचालक यांनी विभाग निहाय विद्यापीठांचे कुलसचिव व महाविद्यालयांचे प्राचार्य यांचे प्रशिक्षण व बैठक आयोजित करण्यात यावी.

५. कला विभाग
- केलेल्या कार्यवाहीचा अहवाल संचालक, तंत्र शिक्षण, मुंबई यांनी अहवाल आयोगास सादर करावा.

६. इतर मागास बहुजन कल्याण विभाग
- सर्व आश्रम शाळांच्या विद्यार्थ्यांची तात्काळ नोंद घ्यावी.
- प्रत्येक जिल्ह्यासाठी किमान २ समन्वयकाची नेमणूक करण्यात यावी.
- संचालक कार्यालयामार्फत संपूर्ण अहवाल आयोगास सादर करावा.

७. समाज कल्याण विभाग
- सर्व सहाय्यक आयुक्तांच्या मार्फत विद्यार्थ्यांपर्यंत माहिती पोहोचवणे.
- सर्व जिल्हा निहाय संकेत स्थळावर माहिती प्रकाशित करावी.
- संविधान जागृती प्रश्न मंजूषामध्ये जास्तीत जास्त विद्यार्थी सहभागी होतील यासाठी प्रयत्न करावे.
- प्रत्येक जिल्ह्यासाठी किमान २ समन्वयकाची नेमणूक करण्यात यावी.

८. शालेय शिक्षण विभाग
- इयत्ता ८ वी वरील विद्यार्थ्यांना संविधान जागृती प्रश्न मंजूषामध्ये सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित करण्यात यावे.

...३..
कृ.मा.प.

- सर्व शाळांना संविधान जागृती प्रश्न मंजूषा अभियानात सहभागी होण्याबाबत सूचना देण्यात यावे व संकेत स्थळावर सुध्दा माहिती प्रकाशित करण्यात यावी.
- प्रत्येक जिल्ह्यासाठी किमान २ समन्वयकाची नेमणूक करण्यात यावी.

९. जिल्हा माहिती अधिकारी
- सर्व विभागांच्या समन्वयकांची माहिती शासकीय सोशल मीडिया व संकेत स्थळावर प्रसिद्ध करण्यात यावी.
- स्पर्धेसंबंधी माहिती वृत्तपत्र, न्यूज चॅनल व न्यूज पोर्टलवर प्रसिद्ध करण्यात यावी.
- वृत्तपत्राच्या प्रसिध्द झालेल्या बातमीचे कात्रण व दुरचित्र वाहिणीवर प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहिराती / बातमीचे व्हिडिओ क्लिपचे संकलन करुन आयोगाकडे वेळोवेळी सादर करावे.

१०. महाराष्ट्र नॅशनल लॉ यूनिव्हर्सिटी
- सर्व शैक्षणिक मॉड्यूल आणि साहित्य तीन भाषांमध्ये (मराठी/हिंदी/इंग्रजी) दि. २०/१२/२०२५ पर्यंत तयार करावे व संबंधीत विभागांना साहित्य उपलब्ध करुन द्यावे.
- अंतिम PDF पाठ्यक्रम २ जानेवारीपर्यंत युवा करिअर सचिवांकडे जमा करावे.
- दि. ५ जानेवारी २०२६ पासून ऑनलाइन प्रशिक्षण सुरू करण्यात यावे.
- प्रश्नसंच तयार करतांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे व आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था (TRTI),पुणे सह इतर विभागांचे मत देखील विचारार्थ घ्यावे.

११. युवा करिअर- नोंदणी नियम
- महाराष्ट्र राज्य बाहेरील विद्यार्थ्यांची नोंदणी करू नये. नोंदणी प्रक्रिया दि. १८/१२/२०२५ पासून सुरु करण्यात यावी.
- ऑनलाइन फॉर्ममध्ये युनिक आयडी ठेवण्यात यावी.
- शाळा / महाविद्यालय / वसतिगृह / आश्रमशाळा ओळखपत्र आवश्यक राहील.
- IP ॲड्रेसद्वारे स्थान पडताळणी (फक्त महाराष्ट्र).

सध्या युवा करिअर वेबसाईटवर एकूण ५७११ विद्यार्थ्यांनी नोंदणी पूर्ण केली आहे. या नोंदणी प्रक्रियेसाठी आतापर्यंत कोणतेही शुल्क आकारलेले नाही. तथापि, ज्या विद्यार्थ्यांनी नोंदणी केलेली आहे परंतु अद्याप शुल्क भरलेले नाही, अशा सर्व विभागानी अशा विद्यार्थ्यांना आपल्या स्तरावरून कळविण्यात यावे की शुल्क भरण्याची प्रक्रिया दि. १८/१२/२०२५ पासून सुरू करण्यात येणार आहे.

श्री. सुनिल वारे, महासंचालक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था बार्टी पुणे यांनी संविधान अमृत महोत्सवी जनजागृती अभियान अंतर्गत आयोजित संविधान प्रश्नमंजूशा २०२५ हा उपक्रम विद्यार्थ्यांमध्ये भारतीय संविधानाचे महत्व, त्यातील मुलभूत अधिकार व कर्तव्ये याबाबत जागरुकता निर्माण करण्यासाठी राबविण्यात येत आहे. हा कार्यक्रम विद्यार्थ्यांना सविधानाची समज वाढविण्यासाठी तज्ञ मार्गर्शन, अनुभवात्मक शिक्षण आणि अभ्यास साहित्य प्रदान करण्याच्या दृष्टीकोणातून अत्यंत महत्वाचा आहे. यामुळे विद्यार्थ्यांना जागरुक, उत्तरदायी आणि सशक्त नागरिक होण्याची संधी मिळेल असे सभेमध्ये सांगण्यात आले.

सर्व विभागांनी आपल्या आधिनस्त असलेले सर्व शाळा / महाविद्यालय / आश्रमशाळा / वसतिगृह व संस्था किती त्याची संपूर्ण माहिती आणि आपणास ज्या मुदद्यावरील कार्य करावयाचे आहे त्या मुदद्याच्या अनुषंगाने आज सायंकाळपर्यंत सविस्तर माहिती आयोगास सादर करावा असे निर्देश मा. ॲड. धर्मपाल मेश्राम, उपाध्यक्ष तथा सदस्य, महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोग, मुंबई यांनी सभेमध्ये दिले. तसेच बैठकीला उपस्थित अधिकारी, पदाधिकारी यांचा व्हाट्सॲप गृप करण्यात यावा अशा सुचना देण्यात आल्या.

...४..
कृ.मा.प.

विद्यार्थ्यांची नोंदणी झाल्यानंतर मा. मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, मा. उपमुख्यमंत्री, सामाजिक न्याय मंत्री, सामाजिक राज्यमंत्री इत्यादीच्या उपस्थितीत संविधान जागृती प्रश्नमंजूषा २०२५ उदघाटन करण्यात येणार आहे अशी माहिती मा. ॲड. धर्मपाल मेश्राम, उपाध्यक्ष तथा सदस्य, महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोग, मुंबई यांनी सभेमध्ये दिली.

नोंदणी केलेल्या सर्व विद्यार्थ्यांना यासंदर्भातील तपशीलवार माहिती अधिकृत ईमेलवरून पाठविण्यात येईल. विद्यार्थ्यांना ऑनलाईन अर्ज करतांना काही समस्या उदभवल्यास त्यांनी त्यांच्या अडचणी support@yuvacareer.com या मेल आयडीवर पाठवावी, याची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात यावी. शाळा / महाविद्यालय / आश्रमशाळा / वसतिगृह व्यवस्थापन समिती निधीमधून / कार्यालयीन खर्चातून / इतर खर्चातून या तीन बाबीमधून प्रश्नमंजुषा परीक्षेसाठी कमीत कमी दहा विद्यार्थ्यांसाठी फी भरण्याबाबत कारवाई करण्यात यावी व सर्व शासकीय विभागांनी व विद्यापीठांना व महाविद्यालय सर्व संकेत स्थळावरती www.yuvacareer.com ही लिंक प्रसिध्द करण्यात यावी. सर्व अधिकृत नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे यांचे मार्फत अधिकृत ऑनलाइन प्रमाणपत्र दिले जाईल. संविधान जागृती प्रश्न मंजूषा संबंधी केलेल्या कार्यवाही अहवाल आयोकडे सादर करण्यात यावा.

(ॲड. धर्मपाल मेश्राम)
उपाध्यक्ष तथा सदस्य,
महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोग,
म. रा., मुंबई

महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती / जमाती आयोग मुंबई

युवा करियर

प्रति,

मा. उपाध्यक्ष तथा सदस्य,
महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती व जमाती आयोग,
म. रा., मुंबई

महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती-जमाती आयोग, वरळी, मुंबई ४०० ०१८
आवक क्र. 4856 दिनांक : 26.8.25
कार्यालय अधीक्षक

**विषय :- भारतीय संविधान जागृती प्रश्न मंजुषा - 2025 : युवा करिअर द्वारे निर्देशिका.**

महोदय,

वरील विषयाच्या अनुषंगाने आपणांस विनंती अर्ज सादर करतो की, बोधी वृक्ष शिक्षण संस्था, नागपूर व्दारा संचालित युवा करियर क्लबव्दारा युवकांचा भविष्याच्या दृष्टीकोनातून विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत असतात. आम्ही समाजातील युवकांमध्ये संविधाना विषयी जनजागृती करण्यासाठी भारतीय संविधान जागृती मंजुषा-२०२५ हा कार्यक्रम राबविणार आहोत. ज्याव्दारे युवकांमध्ये संविधाना विषयी जागृती निर्माण होईल. आम्ही राबविणाऱ्या कार्यक्रमाची रुपरेषा खालीलप्रमाणे असणार आहे.

**1. परिचय :**

भारतीय संविधान, जे 26 जानेवारी 1950 रोजी स्वीकारले गेले, हे जगातील सर्वात मोठ्या लोकशाहीचे अधिष्ठान आहे. ज्यामध्ये न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता यांचे मूल्य अंतर्भूत आहेत. युवा करिअरने भारतीय संविधान क्विझ स्पर्धा 2025 ची सुरुवात केली आहे, ज्यामुळे युवकांमध्ये संविधानाचे महत्त्व समजावे आणि नागरिक ज्ञानास प्रोत्साहन मिळावे. या उपक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये संविधानाच्या तत्त्वांविषयी सखोल आदर निर्माण करणे, त्यांना स्वस्थ स्पर्धेत सहभागी करून घेणे आणि त्यांच्या अधिकार, कर्तव्ये व जबाबदाऱ्यांविषयी जागरूकता वाढवणे हा आहे.

**2. उद्दिष्टे :**

युवा करिअर तर्फे आयोजित भारतीय संविधान क्विझचे उद्दिष्ट :
विद्यार्थ्यांची भारतीय संविधानाच्या इतिहास व संरचनेची समज वाढवणे. नागरिकांचे अधिकार व कर्तव्ये तसेच भारतीय लोकशाहीची कार्यपद्धती याविषयी जागरूकता निर्माण करणे. विद्यार्थ्यांना भारताच्या घटनात्मक इतिहासाची व प्रमुख नेत्यांच्या योगदानाची कदर करण्यास प्रेरित करणे. विद्यार्थ्यांना राज्य पातळीवर असे व्यासपीठ उपलब्ध करून देणे जिथे ते आपले नागरिक ज्ञान व शासनाची समज प्रदर्शित करू शकतील.

**3. प्रमुख फोकस क्षेत्रे :**

प्रस्तावना : न्याय, स्वातंत्र्य, समता व बंधुता यांसारख्या मूल्यांची जाण. मूलभूत अधिकार व कर्तव्ये : संविधानात नमूद केलेल्या अधिकार व कर्तव्यांचा सखोल अभ्यास. धोरण मार्गदर्शक तत्त्वे : शासनात यांची भूमिका व महत्त्व. शासन रचना : कार्यकारी, विधायिका आणि न्यायपालिका यांची भूमिका व कार्ये. मुख्य दुरुस्ती व ऐतिहासिक खटले : सर्वोच्च न्यायालयाचे महत्त्वाचे निर्णय आणि संविधानातील प्रमुख दुरुस्ती. संविधान निर्माता : डॉ. बाबासाहेब आंबेडकर, आणि इतर प्रमुख व्यक्तींचे योगदान.

**4. भारतीय संविधान जागृती प्रश्न मंजुषा - 2025 रचना :**

**नोंदणी** : महाराष्ट्रातील शाळा व महाविद्यालये आपले विद्यार्थी युवा करिअरच्या ऑनलाइन व्यासपीठाद्वारे नोंदवू शकतात. प्रारंभिक फेरी : संविधान, शासन व नागरिक कर्तव्यांविषयी विद्यार्थ्यांचे ज्ञान तपासणारी ऑनलाइन परीक्षा. जिल्हा व राज्य स्तर : प्रारंभिक फेरीतील निवड विद्यार्थी पुढील स्तरावर सहभागी होतील. राज्यस्तर : राज्यस्तरीय विजेते राज्य स्तरावर स्पर्धा करतील.

**Phone.** 9422038808
**Email.** yuvacareerclub2015@gmail.com
**Address.** Shatabdi Sq. Manewada Ring Rode, Nagpur.

युवा करियर

DATE:

5. **भाषा व सुलभता :**
स्पर्धेत व्यापक सहभाग सुनिश्चित करण्यासाठी, भारतीय संविधान जागृती प्रश्न मंजुषा - 2025 मराठी, हिंदी व इंग्रजी भाषांमध्ये आयोजित केली जाईल. यामुळे विविध भाषिक पार्श्वभूमी असलेल्या विद्यार्थ्यांना समान संधी मिळेल.

6. **बक्षिसे व मान्यता :**
**सर्वोत्तम शाळा :** राज्य स्तरावर तीन शाळांना ट्रॉफी, प्रमाणपत्र व रोख पारितोषिके. व्यक्तिगत पुरस्कार : उत्कृष्ट विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती, प्रमाणपत्रे व विशेष मान्यता. सहभाग प्रमाणपत्र : सर्व सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे देण्यात येतील.

7. **आयोजन संस्था :**
युवा करिअर, जी संस्था युवक विकास व करिअर मार्गदर्शन यावर लक्ष केंद्रित करते, ती संविधानाविषयी जागरूकता निर्माण करण्यास व विद्यार्थ्यांमध्ये नागरिक जबाबदारी प्रोत्साहित करण्यास कटिबद्ध आहे.

**नोंदणी प्रक्रिया :**
1. **आंतरिक निवड :** शाळा व महाविद्यालये स्वतःची पहिली निवड फेरी आयोजित करतील. निवडलेले विद्यार्थी प्रारंभिक फेरीसाठी नोंदणी करतील.
2. **पात्रता :** प्रारंभिक फेरीसाठी नोंदणी सर्व शाळा व महाविद्यालयांना खुली आहे.
3. **नोंदणी अट :** शाळा व महाविद्यालयांना किमान 10 विद्यार्थ्यांची नोंदणी करणे बंधनकारक आहे. त्यापेक्षा जास्त विद्यार्थ्यांची नोंदणी करता येईल.
4. **नोंदणी शुल्क :** प्रत्येक विद्यार्थ्यासाठी ₹99 शुल्क लागू होईल. नोंदणीवेळी शाळा / महाविद्यालय हे शुल्क भरतील.
5. **नोंदणी लिंक :** शाळा व महाविद्यालये [युवा करिअर क्लब] www.yuvacareer.com या संकेतस्थळावर जाऊन नोंदणी करू शकतात. नोंदणी व शुल्क भरण्याची प्रक्रिया "भारतीय संविधान क्विझ स्पर्धा"पृष्ठावर उपलब्ध असेल.

तरी वरील कार्यक्रम राबविण्यास आपणांस विनंती करतो, की संबंधीतास त्याबाबत आदेश निर्गमीत करण्यात यावे, ही विनंती.

धन्यवाद !

आपला विश्वासू,

(मोनाल थुल),

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
विद्यार्थी विकास मंडळ
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७.

डॉ. सविता कुलकर्णी
संचालक (अतिरिक्त कार्यभार)

संदर्भ क्र. विविमं/२०२५–२६/४४२ दिनांक : २२/१२/२०२५

प्रति,

मा. प्राचार्य/संचालक/विभागप्रमुख
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित
सर्व महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था,
विद्यापीठ परिसरातील संबंधित शैक्षणिक विभाग, पुणे.

**विषय : भारतीय संविधान जागृती प्रश्नमंजुषा–२०२५ मध्ये आपल्या कार्यक्षेत्रातील संस्थांमार्फत अल्पसंख्यांक विभागाच्या लाभार्थ्यांचा सहभाग वाढविण्याबाबत...**

**संदर्भ क्र : ससं/उशि/पुवि/परिपत्रक/२०२५/ई २४७९४९२ दि. १८.१२.२०२५ चे पत्र**

महोदय/महोदया,

मा. जिल्हा नियोजन अधिकारी तथा जिल्हा अल्पसंख्यांक अधिकारी जिल्हाधिकारी कार्यालय, मा. उपाध्यक्ष तथा सदस्य (सचिव दर्जा), महाराष्ट्र राज्य अनुसुचित जाती आयोग, यांच्या सुचनेनुसार भारतीय संविधान जागृती प्रश्न मंजुषा – २०२५ स्पर्धेत अल्पसंख्यांक विकास विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांचा लाभ घेणाऱ्या लाभार्थ्यांनी या प्रश्नमंजुषेमध्ये मोठया प्रमाणात सहभाग नोंदविणेबाबत निर्देश दिले आहे. या अनुषंगाने महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था/विभागांना तातडीने खालील सूचना देणेबाबत कळविले आहे.

१. प्रश्नमंजूषेत सहभाग : आपल्या संस्थेशी जोडलेल्या अल्पसंख्यांक विकास विभागाच्या योजनांचा लाभ घेण्याच्या सर्व लाभार्थ्यांनी या उपक्रमामध्ये मोठया प्रमाणात सहभागी व्हावे.

२. निर्देशिका : शासनाकडून प्राप्त झालेली 'संविधान जागृती प्रश्नमंजुषा–२०२५ या उपक्रमाची निर्देशिका (Directive) आणि नोंदणीप्रक्रियेची माहिती संस्थांपर्यंत पोहोचवावी.

महाराष्ट्र राज्य अनुसुचित जाती आयोग, मुंबई, मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या निर्देशानुसार आपल्या महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था/विभागांमध्ये भारतीय संविधान जागृती प्रश्न मंजुषा – २०२५ स्पर्धेत अल्पसंख्यांक विकास विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांचा लाभ घेणाऱ्या लाभार्थ्यांनी या प्रश्नमंजुषेमध्ये मोठया प्रमाणात सहभाग नोंदविणेबाबत आपण आपल्या स्तरावर योग्य ती कार्यवाही करावी. या संबंधीचे सविस्तर पत्र आपल्या माहितीसाठी व उचित कार्यवाहीसाठी सोबत जोडले आहे.

सद्यस्थितीत महानगरपालिका, नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुका–२०२५ च्या अनुषंगाने मा. राज्य निवडणूक आयोगामार्फत आदर्श आचारसंहिता लागू करण्यात आलेली आहे. आचारसंहितेचा कोणताही भंग होणार नाही याची तसेच सदर कार्यक्रमास कोणत्याही राजकीय पक्षाचे लोकप्रतिनिधी अथवा त्यांचे प्रतिनिधी उपस्थित राहणार नाहीत याची दक्षता घेऊन सदर उपक्रम राबविण्याबाबतचे निर्देश प्राप्त झाले आहेत. त्यानुसार सदर कार्यक्रमांचे आयोजन करताना आदर्श आचारसंहितेचा कोणताही भंग होणार नाही तसेच याबाबत शासनाच्या प्राप्त निर्देशांचे तंतोतंत पालन होईल याची नोंद घ्यावी.

भारतीय संविधान जागृती प्रश्न मंजुषा – २०२५ स्पर्धेत सहभाग घेण्याबाबतची माहिती आपल्या महाविद्यालय/परिसंस्था/विभागातील मुख्य सूचना फलकावर तसेच विद्यार्थी एकत्र येणाऱ्या (उदा. ग्रंथालय/वाचनकक्ष/वर्गखोल्या/विश्रांतीगृह/उपहारगृह/वसतिगृह) अशा दर्शनीय भागात प्रदर्शित करुन जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करावे तसेच सर्व विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून देण्याबाबत संबंधितास सूचित करावे.

सदर कार्यक्रमात सहभाग नोंदविणाऱ्या लाभार्थ्यांच्या माहितीसह अहवाल मा. जिल्हा नियोजन अधिकारी तथा जिल्हा अल्पसंख्यांक अधिकारी जिल्हाअधिकारी कार्यालय, पुणे. यांच्या dpopune85@gmail.com या ई मेल आयडीवर पाठविण्यात यावा. कळावे हि विनंती.

सोबत : वरीलप्रमाणे

(डॉ. सविता कुलकर्णी)
संचालक, (अतिरिक्त कार्यभार), विद्यार्थी विकास मंडळ